आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२८ एप्रिल २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मणिपूरच्या आऊटर मणीपूर लोकसभा मतदारसंघातल्या सहा मतदान केंद्रावर फेरमतदान घेण्याचे भारत निवडणूक आयोगाचे आदेश

- काँग्रेस खोट्या गोष्टी पसरवून लोकशाही कमकुवत करत असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आरोप

- भाजप सरकारनं गेल्या १० वर्षांत गरीब आणि आदिवासी जनतेवर अन्याय केल्याचा प्रियंका गांधी वढेरा यांचा आरोप

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु तसंच चेन्नई सुपर किंग्ज्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सामने रंगणार

**आणि**

- देशात अनेक ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

मणीपूरमधील आऊटर मणीपूर लोकसभा मतदारसंघातल्या सहा मतदारसंघात पुन्हा मतदान घेण्याचा आदेश निवडणूक आयोगानं दिला आहे. आयोगानं ३० एप्रिल रोजी सकाळी ७ ते संध्याकाळी ४ या वेळात मतदान घ्यायला सांगितलं आहे. उखरुल जिल्ह्यातल्या पाच आणि सेनापती जिल्ह्यात एका मतदारसंघात २६एप्रिलला झालेलं मतदान आयोगानं रददबातल ठरवलं आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी देशभरात प्रचारानं वेग धरला आहे.

भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज कर्नाटक दौऱ्यावर आहेत. बेळगावी इथं झालेल्या सभेनंतर ते कर्नाटकात सिरसी, दावणगेरे आणि बेल्लारी इथं प्रचारसभा घेणार आहेत.

उत्तर प्रदेशात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा कासगंज, मैनपूरी आणि इटावा इथं प्रचारसभा घेणार आहेत, तर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डापश्चिम बंगाल आणि ओदिशामध्ये प्रचारसभा घेणार आहेत. पक्षाचे ज्येष्ठ मंत्री राजनाथ सिंह गुजरातमध्ये प्रचारसभा घेणार आहेत.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे देखील आज ओदिशात केंद्रपाडा, कटक, जाजपूर आणि जगतसिंहपूर इथं सभा घेतील. तर समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव आग्रा इथं रॅलीमध्ये सहभागी होणार आहे. आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल आज दिल्लीमध्ये रोड शो करणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपाचे जेष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकात बेळगावी इथं प्रचारसभेत बोलताना, काँग्रेस खोट्यानाट्या गोष्टी पसरवून लोकशाही कमकुवत करत असल्याचा आरोप केला. कर्नाटकात काँग्रेस मतपेढीचं आणि तुष्टीकरणाचं राजकारण करत कायदा सुव्यवस्थेला सुरुंग लावत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. केंद्रसरकारनं मंजूर केलेल्या भारतीय न्याय संहितेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती सुधारेल, असा दावा त्यांनी यावेळी केला. शेतकरी उत्पादक संघांच्या माध्यमातून गेल्या दहा वर्षांमध्ये निविष्ठांच्या किंमतीत घट आणि

शोतमालाला खुली बाजारपेठ मिळाली, असं सांगत आपल्या सरकारने छोट्या शेतकऱ्यांना मदत केली आहे असंही मोदी यावेळी म्हणाले.

**<><><><>**

काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वड्रा यांनी काल गुजरातमध्ये वलसाड जिल्ह्यात धरमपूर इथं प्रचारसभा घेतील. भाजप सरकारनं गेल्या १० वर्षांत गरीब आणि आदिवासी जनतेवर अन्याय केल्याचा आरोप त्यांनी केला. काँग्रेस पक्ष सत्तेत आल्वर आदिवासी जनतेसाठी विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करेल, गरीब, शेतकरी आणि वंचितांच्या कल्याणासाठी काम करेल असं आश्वासन त्यांनी दिल.

**<><><><>**

काँग्रेस पक्ष लोकसभा निवडणुकीसाठी उत्तर प्रदेशातल्या प्रलंबित जागांसह, उमेदवारांची पुढची यादी येत्या दोन दिवसांत जाहीर करेल असं काँग्रेसचे सरचिटणीस के सी वेणुगोपाल यांनी म्हटलं आहे. काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची काल बैठक झाली. उत्तर प्रदेशातल्या रायबरेली आणि अमेठी या महत्वाच्या जागांसाठीच्या उमेदवारांविषयी या बैठकीत चर्चा केली गेली. या दोन्ही जागांवर गांधी कुटुंबातले सदस्यच उमेदवार असावेत असा प्रस्ताव या बैठकीत मांडला गेल्याचं वृत्त आहे.

**<><><><>**

आम आदमी पार्टी बरोबर युती करण्याच्या काँग्रेसच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करत दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष अरविंदर सिंग लवली यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आपच्या काळात दिल्लीची सार्वजनिक व्यवस्था माजी मुख्यमंत्री शीला दिक्षित यांच्या कार्यकाळाहून अधिक वाईट झाली आहे, असा

आरोप लवली यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांना लिहीलेल्या पत्रात केला आहे. दिल्ली काँग्रेस आपबरोबर युती करण्याच्या विरोधात होती, असंही त्यांनी या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी उत्तर मुंबईला उत्तम मुंबई बनवण्याचा आपला निर्धार असल्याचं भाजपा नेते पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत आयोजित एका पत्रकार परिषदेत बोलत होते. विविध उद्योग आणि कापड व्यापाराचं केंद्र बनत असलेल्या उत्तर मुंबईला आधुनिक तंत्रज्ञांवर आधारित वाहतूक व्यवस्था प्रदान करणं आणि उत्तर मुंबई प्रदूषणमुक्त करणं याला प्राधान्य दिलं जाईल, असंही त्यांनी संगितलं. यावेळी महाराष्ट्र प्रदेश भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आणि उत्तर मुंबई भाजप प्रसिद्धी प्रमुख नीला सोनी राठोड उपस्थित होत्या.

**<><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी साडेतीन वाजता गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात सामना होणार आहे, तर संध्याकाळी साडेसात वाजता चेन्नई सूपर किंग्ज्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सामना रंगणार आहे.

स्पर्धेत काल राजस्थान रॉयल्स आणि लखनऊ सूपर जाएंट्स यांच्यात झालेला सामना राजस्थान रॉयल्सनं ७ गडी राखून जिंकला. विजयासाठीचं १९७ धावांचं आव्हान राजस्थानं एक षटक शिल्लक असतानाच गाठलं.

**<><><><>**

मणीपूरमध्ये केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि मणीपूर पोलिसांनी नरसैना गावाजवळच्या डोंगराळ भागात काल शोध आणि तपास मोहिम राबवून शस्त्रात्रं आणि दारुगोळा जप्त केला. नरसैना गावात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकडीवर काही सशस्त्र अज्ञातांनी  परवा मध्यरात्री हल्ला केला होता. त्या हल्ल्यात पोलिस उपनिरिक्षक आणि मुख्य हवालदाराचा मृत्यू झाला होता.

दरम्यान सुरक्षा दलावरच्या हल्ल्याचा मणीपूरचे  मुख्यमंत्री बिरेन सिंग यांनी निषेध केला आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात बसंतगढ प्रभागातल्या एका गावात गस्त घालणाऱ्या ग्रामरक्षकांवर गोळीबार झाला. गुज्जर ढोक वनविभागात लपलेल्या काही दहशतवाद्यांनी  गोळीबार केला असावा, असा अंदाज आहे. सुरक्षा कर्मचारी घटनास्थळी पोचले असून घटनेचा तपास सुरु आहे.

**<><><><><>**

इराणने ताब्यात घेतलेल्या पोर्तुगीज जहाजावरच्या भारतीय कर्मचाऱ्यांना भारतीय वकिलातीशी संपर्क साधायला इराणने काल परवानगी दिली. पोर्तुगालचा झेंडा असलेलं आणि इराणच्या हद्दीत संचार करत असलेलं जहाज दोन आठवड्यांपूर्वी इराणने ताब्यात घेतलं होतं.  जहाजावरच्या भारतीय कर्मचाऱ्यांना सोडण्यावर  माणूसकीच्या दृष्टीकोनातूून  विचार करत असल्याचं इराणच्या परराष्ट्रखात्यानं म्हटलं आहे.  जहाजावर असलेले भारतीय कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या संपर्कात असल्याचं  भारताच्या परराष्ट्र व्यवहार खात्याच्या प्रवक्त्याने सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय सुशासन केंद्र आणि बांगलादेशाचे सार्वजनिक प्रशासन मंत्रालय यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराचे नूतनीकरण करण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी प्रशासनिक सुधार आणि सार्वजनिक तक्रार विभागाचं ४ सदस्यीय शिष्टमंडळ बांगलादेशाला भेट देणार आहे. विभागाचे सचिव व्ही श्रीनिवास या शिष्टमंडळाचं नेतृत्व करणार असून ३ दिवसांच्या भेटीत हे मंडळ वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण लातूर आणि बीड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

कोकण, केरळ, माहे, कर्नाटक आणि आंध्रची किनारपट्टी या प्रदेशांमध्ये उष्म्याबरोबरच दमट हवामान येते दोन तीन दिवस टिकून राहिल असा अंदाज भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे. पश्चिम बंगालमधला गंगेजवळचा प्रदेश आणि ओदिशात अतीतीव्र उष्म्याची लाट असल्याचा इशाराही विभागानं दिला आहे. बिहार, झारखंड, रायलसीमा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, माहे, कोकण, उत्तर प्रदेश, आंध्राची किनारपट्टी आणि यानम इथं येते चार पाच दिवस तापमान कायम राहील, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२८ एप्रिल २०२४ - रविवार